# ✸ अहवाल ✸

# Adult Education, Population Club / Literary Association

१) मा. प्राचार्य साहेब यांचे कामवाटपाचे पत्र

२) यानुसार सत्र २०१८–१९ मध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनात प्रा. डॉ. अमिता बन्नोरे यांच्या संचालनात 'निरंतर शिक्षण व विस्तार विभाग' या मंडळाची स्थापना करण्यात आली. या मंडळाअंतर्गत चार उपविभाग नेमण्यात आले. यातील चौथा विभाग Adult Education, Population Club / Literary Association चे प्रमुख प्रा. दिलीप घोनमोडे यांचेकडे एक सदस्यीय उपविभाग देण्यात आला. प्रा. डॉ. अमिता बन्नोरे यांच्या मार्गदर्शनात प्रा. दिलीप घोनमोडे यांनी प्रा. मोहनलाल रामटेके यांना या समितीत सहभागी करून घेतले. आणि या समितीतर्फे वार्षिक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. या नियोजनानुसार २०१८–१९ या शैक्षणिक सत्रात समितीची सभा घेऊन खालील कार्यक्रम घेण्याचे ठरले.

१) जागतिक लोकसंख्या दिनानिमित्य कार्यक्रम घेणे. (दि. ११/०७/२०१८)

२) आंतरराष्ट्रीय साक्षरता रॅलीचे आयोजन करणे. (दि. ०८/०९/२०१८)

३) स्वच्छता अभियान राबविणे. (दि. ०२/१०/२०१८)

४) जागतिक एड्स प्रतिबंधक दिनानिमित्य रॅली काढणे व कार्यक्रमाचे आयोजन करणे. (डिसेंबर)

५) गोंडवाना विद्यापीठाच्या निरंतर प्रौढ शिक्षण विभागाच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांकडून प्रकल्प राबविणे.

## ➢ जागतिक लोकसंख्या दिन : ११ जुलै :–

नियोजनानुसार दि. ११/०७/२०१८ ला जागतिक लोकसंख्या दिनाचा कार्यक्रम खोली क्र. १९ मध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजेंद्र घोनमोडे हे होते. तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. विजय गोरडे हे होते. या व्यतिरिक्त कार्यक्रमाला प्रा. प्रियदर्शन गनवीर, प्रा. पराग मेश्राम व प्रा. डॉ. अमिता बन्नोरे या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन प्रा. दिलीप घोनमोडे व आभार डॉ. राजेंद्र चव्हाण यांनी मानले.

## ➢ आंतरराष्ट्रीय साक्षरता रॅली : ०८ सप्टेंबर :–

नियोजनानुसार विभागाच्या वतीने दि. ०८/०९/२०१८ ला आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्य सकाळी १०.३० ला रॅलीचे आयोजन करण्यात आले. प्रा. दिलीप घोनमोडे यांनी दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना रॅलीचे महत्व सांगीतले. या रॅलीस उपप्राचार्य डॉ. राजेंद्र घोनमोडे यांनी हिरवी झेंडी दाखवून रॅलीस प्रारंभ झाला. महाविद्यालयाच्या शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेल्या या रॅलीस 'एकमेका शिक्षण देऊ भारताला पुढे नेऊ' अशा अनेक घोषणा व नारे दिले. महाविद्यालयातून निघालेली ही रॅली वडसा रोड



Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

ते बर्डी आरमोरी या मुख्य रस्त्यावरून साक्षरतेचा प्रसार करत निघाली. आणि परत महाविद्यालयात आली. रॅलीमध्ये विद्यार्थ्यांसह प्रा. डॉ. अमिता बन्नोरे, प्रा. शशिकांत गेडाम, प्रा. गजेंद्र कढव, प्रा. मोहनलाल रामटेके आणि महाविद्यालयाच्या अनेक प्राध्यापक वृंदांनी सहभाग घेतला. शिस्त पालन आणि शिक्षणचा प्रसार हा या कार्यक्रमाचा उद्देश यशस्वी झाला.

### ➢ स्वच्छता दिन : ०२ ऑक्टोंबर :–

महाविद्यालयात महात्मा गांधी जयंती दिन ०२ ऑक्टोंबरला साजरी करण्यात येते. या निमित्य स्वच्छता कार्यक्रम सुद्धा राबविण्यात येतो. विभागाच्या वतीने ०२/१०/२०१८ ला प्रा. दिलीप घोनमोडे यांनी राममंदीर ते महात्मा गांधी कन्या विद्यालय, आरमोरी या परिसरात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून रस्ता स्वच्छता करून स्वच्छता कार्यक्रमास सहकार्य केले.

### ➢ जागतिक एड्स सप्ताह : ०१ ते ०७ डिसेंबर :–

विभागाच्या वतीने एड्स या आंतरराष्ट्रीय जीव घेण्या आजाराने जगाला विळखा घातला आहे. त्या विरूद्ध जन जागृती म्हणून युनोने ०१ ते ०७ डिसेंबर हा जागतिक एड्स सप्ताह ठरविला. महाविद्यालयात निरंतर शिक्षण व विस्तार विभागाच्या संचालक प्रा. डॉ. अमिता बन्नोरे यांच्या मार्गदर्शनानुसार या जागृती सप्ताहाच्या निमित्याने रॅलीचे आयोजन करण्यात आले.

### ➢ मतदार जनजागृती रॅली : २५ जानेवारी :–

२५ जानेवारी २०१८ ला मतदार जनजागृतीचे औचित्य साधून महाविद्यालयीन सज्ञान विद्यार्थ्यांना मतदान करण्याची शपथ देण्यात आली. सकाळी १०.३० ला महाविद्यार्थ्यांकडून मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. राजेंद्र घोनमोडे व प्रा. रमेश ठोंबरे यांनी हिरवी झेंडी दाखविल्यानंतर मतदार जनजागृतीच्या विविध घोषणा देत व घोषणा फलके घेऊन विद्यार्थ्यांची ही रॅली काढण्यात आली. महाविद्यालयातून निघून वडसा मार्ग व ब्रम्हपुरी बर्डी मार्ग आरमोरीच्या मुख्य रस्त्यावरून निघून ही रॅली घोषणा देत महाविद्यालयात परत आली. या निमित्ताने विद्यार्थ्यांकडून जनजागृती दौड स्पर्धेचे सुद्धा आयोजन करण्यात आले.

### ➢ गोंडवाना विद्यापीठ निर्देशीत प्रकल्प :–

गोंडवाना विद्यापीठाने विभागाला ठरवून दिलेल्या प्रकल्पानुसार दत्तक ग्राम कासवी येथे लोकसंख्या शिक्षण आणि महिला अध्ययन व सेवा केंद्रामार्फत एकूण ६५ विद्यार्थ्यांनी प्रकल्प राबविण्यास नाव नोंदणी केली. त्यापैकी एकूण २८ विद्यार्थ्यांनी प्रकल्पात प्रत्यक्ष सहभाग घेऊन प्रकल्प वह्या सादर केल्या.

# कार्यक्रमांची छायाचित्रणे व बातम्या

➢ **जागतिक लोकसंख्या दिन : ११ जुलै :–**




जागतिक लोकसंख्या दिन कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना प्रा. दिलीप घोनमोडे



**आजच्या तरुणांनी 'एक कुटुंब, एक अपत्य' संकल्पना अंमलात आणावी**

आरमोरी, कुरखेडा, धानोरा येथील महाविद्यालयात 'जागतिक लोकसंख्या दिन'



**महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी**

**महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी :** स्थानिक महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व.न.प. वाणिज्य महाविद्यालयातील आजीवन शिक्षण मंडळ आणि विस्तार विभाग, भूगोल विभाग व रासेयो विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली जागतीक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य राजेंद्र घोनमोडे, प्रा. पराग मेश्राम, प्रा. डॉ. विजय गोरडे, डॉ. उत्तमचंद कांबळे, डॉ. राजेंद्र चौव्हाण आदी उपस्थित होते. याप्रसंगी प्रा. डॉ. गोरडे यांनी २०१८ च्या लोकसंख्या दिनानिमित्त युनोने फॅमिली प्लॅनींग एम्पॉवरमेंट पिपल एन्ड डेव्हल नेशन या थीमच्या नियोजनाची माहिती दिली. संचालन प्रा. दिलीप घोनमोडे, आभार डॉ. रजिंद्र चव्हाण यांनी केले. यशस्वीतेसाठी डॉ. अमिना बन्नोरे, प्रा. मोहन रामटेके, प्रा. किशोर हजारे, डॉ. विशाखा वंजारी, डॉ. विजय रेवनकर, प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. नोमेश मेश्राम, डॉ. मनोज ठवरे, प्रा. गजानन बोरकर, प्रा. गजेंद्र कढव, प्रशांत दडपल यांनी सहकार्य केले.

जागतिक लोकसंख्या दिन कार्यक्रमाच्या वृत्तपत्रातील बातम्या

3

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

➢ आंतरराष्ट्रीय साक्षरता रॅली : ०८ सप्टेंबर :–



साक्षरता रॅलीचे छायाचित्र

## महात्मा गांधी महाविद्यालयात व्याख्यान



आरमोरी : स्थानिक महात्मा गांधी कला, विज्ञान व नसरूद्दिनभाई पंजवानी वाणिज्य महाविद्यालयात निरंत प्रौढ शिक्षण व विस्तार विभागातर्फे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा शारीरीक व मानसिक बदल होतांना वयाची काळजी या विषयावर प्रा. प्रिया मेश्राम यांचे विशेष व्याख्यान झाले. प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या व्यांख्यानात वक्त्रा प्रा. प्रिया मेश्राम यांनी तारूण्यपणातील अनेक धोके सांगुन त्यावर उपाययोजना म्हणुन काळजी घेण्याचे आवाहन केले. प्रश्नोत्तराच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांसोबत प्रत्यक्ष सुसंवाद साधण्यात आला. यावेळी झालेल्या व्याख्यानात प्रा. नोमेश मेश्राम, प्रा. दिलीप घोनमोडे उपस्थित होते.

## शारीरिक व मानसिक बदलाव की स्थिति पर व्याख्यान

संवाददाता। आरमोरी. महात्मा गांधी कला, विज्ञान व न.पं. वाणिज्य महाविद्यालय में निरंतर प्रौढ़ शिक्षा व विस्तार विभाग की ओर से महाविद्यालयीन विद्यार्थियों के लिए शारीरिक व मानसिक बदलाव की स्थिति पर व्याख्यान का आयोजन किया गया। इस कार्यक्रम की प्रमुख मार्गदर्शक प्रा. प्रिया मेश्राम ने युवावस्था में आनेवाली अनेक अड़चनें व खतरें की जानकारी देते हुए उस पर उपाययोजना करने का आह्वान किया। प्रश्नमंजुषा के माध्यम से विद्यार्थियों के साथ संवाद किया गया। प्राचार्य डा. लालसिंह खालसा के मार्गदर्शन में आयोजित कार्यक्रम में प्रा. नामेश मेश्राम, प्रा. दिलीप घोनमोड़े, प्रा. स्नेहा मोहुर्ले, प्रा. दयाराम मेश्राम आदि उपस्थित थे। संचालन प्रा. घोनमोड़े ने किया। आभार प्रा. मेश्राम ने माना।

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त कार्यक्रमाच्या वृत्तपत्रातील बातम्या



Principal
Mahatma Gandhi Arts, Science & Late N. P. Commerce College, Armori, Dist - Gadchiroli

## ➢ स्वच्छता दिन : ०२ ऑक्टोंबर :–



आरमोरी - महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न.पं. वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. [illegible]

### महात्मा गांधीजींचा वैचारिक पाया ग्रामोद्धाराचा -बंडोपंत बोढेकर

◆ महात्मा गांधी यांनी राष्ट्रोध्दारासाठी आश्रमीय जीवन जगले. सर्व आश्रम खेड्यात उभे केले. त्यांचा वैचारिक पाया ग्रामोद्धारावर आधारलेला आहे. गावाच्या उत्थानासाठी त्यांनी ग्रामसुधारणा, स्वच्छता, अस्पृश्यता व अंधश्रध्दा निर्मूलन, व्यसनमुक्ती, चरखा, स्वावलंबन आदी उपक्रम त्यांनी राबविले, असे प्रतिपादन रौप्य महोत्सवी झाडीबोली साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर यांनी केले. राष्ट्रपिता महात्मा गांधी व पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त स्थानिक महात्मा गांधी महाविद्यालयात कार्यक्रम घेण्यात आला, यावेळी ते बोलत होते. गांधी चौकातील महात्मा गांधीजींच्या पुतळ्याला माल्यार्पण करण्यात आले.



डॉ. नवलाजी मुळे यांना पुरस्कार प्रदान करताना किशोर वनमाळी, बंडोपंत बोढेकर.

त्यानंतर विद्यार्थ्यांची फेरी शहरातून काढण्यात आली. महाविद्यालयातील महात्मा गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, स्व. वामनराव वनमाळी यांच्या पुतळ्याला माल्यार्पण केल्यानंतर उपस्थित विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी व्यसनमुक्तीची शपथ घेतली. महाविद्यालयात लावलेल्या व्यसनमुक्ती केंद्र व रासेयो, चित्र प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला संस्थाध्यक्ष किशोर वनमाळी, उमाकांत वनमाळी, दीपक वेहरे, पप्पू पंजवानी, प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, साईनाथ अडलवार, प्रा. शशिकांत गेडाम, मुख्याध्यापक शरद जौंजाळकर उपस्थित होते. या कार्यक्रमात ग्रामगीताचार्य डॉ. नवलाजी मुळे यांचा मानवसेवा पुरस्काराने सन्मान करण्यात आला. तसेच आचार्य पदवी प्राप्त झाल्याबद्दल प्रा. डॉ. छगन मुंगमोडे, प्रा. डॉ. राजेंद्र कढव यांचा संस्थाध्यक्ष किशोर वनमाळी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त शिक्षक वाय. एम. गायकवाड, के. टी. गायधने, दौलत कुथे, प्रयोगशाळा परिचर गराडे यांचा सत्कार व २०१८ मध्ये झालेल्या स्पर्धा रत्न परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. संचालन प्रा. सीमा नागदेवे, प्रा. डॉ. विजय रैवतकर तर आभार साईनाथ अडलवार यांनी मानले.



महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी

अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका साळवे होत्या. कार्यक्रमाला समस्त शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी :** येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५० वी जयंती व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष किशोर वनमाळी होते. कार्यक्रमाप्रसंगी ग्रामगीताचार्य डॉ. नवनाथ मुळे यांना मानवसेवा

### राष्ट्रसंतांची शिक्षणपद्धती देशाला प्रगतीपथावर नेईल - डॉ. मुळे

प्रतिनिधी / आरमोरी

आजच्या धकाधकीच्या व व्यस्त जीवनात गांधीजी आणि राष्ट्रसंतांनी सांगितलेली आत्मिक उन्नतीची शिक्षणपद्धती देशाला प्रगतीच्या मार्गावर नेईल, असे प्रतिपादन भुवैकुंठ आत्मानुसंधन केंद्र टेकडी अड्याळचे अध्यक्ष डॉ. नवलाजी मुळे यांनी केले.

स्थानिक महात्मा गांधी महाविद्यालयात सांस्कृतिक व रासेयो यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती काल साजरी करण्यात आली. यावेळी ते सत्कारमूर्ती म्हणून बोलत होते. ' अध्यक्षस्थानी किशोर वनमाळी होते. कार्यक्रमास बंडोपंत बोढेवार उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना किशोर वनमाळी म्हणाले, राष्ट्रपिता महात्मा गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व वामनरावजी वनमाळी यांच्या आदर्शावर संस्थेच्या वटवृक्षाची ध्येय धोरणे आहेत त्यासाठी प्रत्येक सदस्य व कर्मचाऱ्यांनी बांधिलकी जोपासली पाहिजे, असे ते म्हणाले.

याप्रसंगी ग्रामगीताचार्य डॉ. नवलाजी मुळे यांना मानसेवा पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच सत्र २०१८ ला आचार्य पदवी प्राप्त प्रा. डॉ. छगन मुंगमोडे, प्रा. डॉ. गजेंद्र कदव यांचा संस्थाध्यक्ष किशोर वनमाळी यांच्या हस्ते शाल, श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. तसेच सेवानिवृत्त शिक्षक वाय. एम. गायकवाड, के. टी. गायधने, दौलत कुथे, गराडे यांचा व २०१८ मध्ये झालेल्या 'स्पर्धारत्न' परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला.

**महात्मा गांधी जयंती व स्वच्द्ता दिन कार्यक्रमाच्या वृत्तपत्रातील बातम्या**



Principal
Mahatma Gandhi Arts, Science & Late N. P. Commerce College, Armori, Dist - Gadchiroli





परिसर स्वच्छ करतांना महाविद्यालयीन विद्यार्थी

## स्वच्छता जीवनाचा अविभाज्य भाग होण्याची गरज

**प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांचे प्रतिपादन**

*तालुका प्रतिनिधी/ २६ ऑगस्ट*



आरमोरी : स्वतःची आणि परिसराची स्वच्छता ही नैतिक जबाबदारी आहे. ही जबाबदारी आपण कर्तव्यभावनेने पार पडल्यास आपला परिसर व देश स्वच्छ झाल्याशिवाय राहणार नाही.

खरेतर स्वच्छता ही आपली जीवनशैली व्हावी स्वच्छता आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग होण्याची गरज आहे. त्याशिवाय सुंदर आणि स्वच्छ देशाचे आपण स्वप्न पाहु शकत नाही, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी केले. ते महाविद्यालयात आयोजित स्वच्छता पंधरवडा समारोपीय समारंभात बोलत होते. यावेळी त्यांनी गेल्या पंधरा दिवसात महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थी यांनी कर्तव्यभावनेतुन स्वच्छताविषयक विविध उपक्रमांत दिलेल्या उत्स्फुर्त प्रतिसादाबद्दल व सहभागाबद्दल सर्वांचे अभिनंदन केले आणि आयुष्यात स्वच्छतेचे दुत म्हणुन सर्वांनी सेवाभावनेतुन कार्य करावे असे आवाहन केले. महात्मा गांधी कला विज्ञान व नसरूद्दिनभाई पंजवानी वाणिज्य महाविद्यालय आरमोरी येथे युवा क्रीडा मंत्रालय, रासेयो क्षेत्रिय निदेशालय पुणे, रासेयो कक्ष, मंत्रालय आणि गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांच्या निर्देशानुसार महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालय व परिसरात स्वच्छता पंधरवाडा दि. १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान विविध कृतिशील उपक्रम राबवून साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र चव्हाण, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. सीमा नागदेवे, प्रा. गजेंद्र कढव यांच्या नेतृत्वात महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, रासेयो स्वयंसेवक आणि विद्यार्थ्यांनी स्वच्छताविषयक विविध उपक्रमांत सहभाग घेतला.

स्वच्छता अभियानाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश ठौंबरे, डॉ. राजेंद्र घोनमोडे, रा.से.यो. प्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र चव्हाण, डॉ. विशाखा वंजारी, प्रा. गंगाधर जुआरे, डॉ. अमिता बन्नोरे, प्रा. शशिकांत गेडाम, प्रा. किशोर हजारे, प्रा. मोहन रामटेके, प्रा. इशाक खान, डॉ. जयेश पापडकर, डॉ. उत्तमचंद कांबळे, प्रा. दिलीप घोनमोडे, प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. नीमेश मेश्राम, प्रा. पराग मेश्राम, प्रा. सत्येंद्र सोनटक्के, डॉ. छगन मुंगमोडे, डॉ. वसंता कहालकर, प्रा. प्रियदर्शन गणवीर, डॉ. मनोज ठवरे, प्रा. गजानन बोरकर, प्रा. स्नेहा मोहुर्ले, शिक्षकेतर कर्मचारी, रासेयो स्वयंसेवक यांनी परीश्रम घेतले.



## महात्मा गांधी मवि मना रहा स्वच्छता पखवाड़ा

**निकाली गई स्वच्छता रैली**

आरमोरी(सं). भारत सरकार की स्वच्छ भारत अभियान के अंतर्गत महात्मा गांधी महाविद्यालय में स्वच्छता पखवाड़ा मनाया जा रहा है. [illegible]

## महात्मा गांधी महाविद्यालयात स्वच्छता रॅली

आरमोरी : स्थानिक महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व.न.प. वाणिज्य महाविद्यालयात स्वच्छ भारत अभियानांतर्गत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता रॅली आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छताविषयक जाणीव जागृती करण्यासाठी व आपले आरोग्य स्वस्थ राखण्यासाठी आरमोरी शहराच्या मुख्य रस्त्यावरुन नेताना स्वच्छताविषयक घोषवाक्य देत ही रॅली फिरविण्यात आली. रॅलीदरम्यान रासेयो स्वयंसेवकांनी हागणदारीमुक्त गाव यावर पथनाट्य सादर करून स्वच्छताविषयक अधिक जागृतीचा संदेश दिला. यावेळी स्वच्छता रॅलीला संबोधीत करताना रासेयो विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र चव्हाण यांनी स्वच्छतेचे महत्व पटवुन दिले. रॅलीला प्रभारी प्राचार्य डॉ. राजेंद्र घोनमोडे, डॉ. रमेश ठोंबरे, डॉ. अमिता बन्नोरे व डॉ. विशाखा वंजारी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. राजेंद्र कढव, प्रा. डॉ. वसंता कहालकर, प्रा. छगन मुंगमोडे व प्रशांत दडमल यांनी सहकार्य केले.



## आरमोरीत स्वच्छतेची जनजागृती

आरमोरी : येथील महात्मा गांधी महाविद्यालयाच्या वतीने स्वच्छता पंधरवडा साजरा केला जात आहे. १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छतेविषयी विविध कार्यक्रम घेण्यात येत आहेत. नागरिकांमध्ये याविषयी जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने आरमोरी येथे स्वच्छता जनजागृती रॅली मुख्य मार्गाने काढण्यात आली. त्यानंतर चौकात रासेयो स्वयंसेवकांनी गोदरीमुक्तीवर पथनाट्य सादर केले. याप्रसंगी रासेयो विभाग प्रमुख प्रा.डॉ.राजेंद्र चव्हाण, प्रभारी प्राचार्य डॉ.राजेंद्र घोनमोडे, डॉ.रमेश ठोंबरे, डॉ.अमिता बन्नोरे, डॉ.विशाखा वंजारी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी प्रा.सीमा नागदेवे, डॉ.राजेंद्र कढव, प्रा.डॉ.वसंता कहालकर, प्रा.छगन मुंगमोडे, प्रशांत दडमल यांनी सहकार्य केले.

स्वच्छता रॅली व स्वच्छता जनजागृती विषयीच्या वृत्तपत्रातील बातम्या



Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

➢ **जागतिक एड्स सप्ताह : ०१ ते ०७ डिसेंबर :–**



जागतिक एड्स दिनानिमित्त काढलेल्या रॅलीचे छायाचित्र



महात्मा गांधी महाविद्यालय आरमोरी

जागतिक एड्स दिन कार्यक्रमाची वृत्तपत्रातील बातमी



M.G. Art's, Science & late N.P. Commerce College ★Armori★

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,

## ➢ मतदार जनजागृती रॅली : २५ जानेवारी :–

### मतदानातून लोकशाहीचा मुलाधार सक्षम करण्यास मदत

प्रा. डॉ. लालसिंग खालसा यांचे प्रतिपादन




### जागृत मतदारच लोकशाही बळकट करतो : डॉ. खालसा



### मतदान करणे म्हणजे लोकशाहीचा मुलाधार सक्षम करणे- प्राचार्य खालसा

प्रतिनिधी/ गडचिरोली

स्वतंत्र भारताने संसदीय लोकशाही ही शासनाची व्यवस्था स्वीकारली. त्याचा मुलाधारच भारतीय जनता आहे. त्यामुळे लोकशाही सक्षम व अधिक क्रियाशील करण्याची जबाबदारी जनतेवर येते. ही जबाबदार जनमताद्वारे प्रदर्शित होते. त्यामुळे लोकशाहीचा मुलाधार बळकट करण्यासाठी प्रत्येक सज्ञान नागरिकांनी मतदान केले पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनी केली.

महात्मा गांधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्यावतीने राष्ट्रीय मतदार जनजागृती कार्यक्रमानिमित्त रॅली काढून जनजागृती करण्यात आली. यावेळी ते बोलत होते. रॅलीचा शुभारंभ प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश ठोंबरे, डॉ. राजेंद्र घोनमोडे यांनी हिरवी झेंडी दाखवून केला. रॅलीमध्ये प्रा. गंगाधर जुआरे, प्रा. डॉ. विशाखा वंजारी, प्रा. डॉ. अमिता बन्नोरे, प्रा. डॉ. राजेंद्र चव्हाणे, प्रा. डॉ. चंद्रकांत डोर्लीकर, प्रा. डॉ. जयेश पापडकर, प्रा. शशिकांत गेडाम, प्रा. दिलीप घोनमोडे, प्रा. पराग मेश्राम, प्रा. डॉ. विजय गोरडे, प्रा. डॉ. विजय रैवतकर, प्रा. डॉ. गजेंद्र कढव, प्रा. गजानन बोरकर व विद्यार्थ्यांनी सहभागी झाले होते.

मतदार जनजागृती विषयीच्या वृत्तपत्रातील बातम्या

### आरमोरीत मतदार जागृती रॅली




आरमोरी / महात्मा गांधी कला, विज्ञान व न.प. वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय मतदार जनजागृती कार्यक्रमानिमित्त महाविद्यालयातून रॅली काढून मतदार जागृतीचा संदेश दिला. रॅलीला प्रभारी प्राचार्य डॉ. रमेश ठोंबरे, डॉ. राजेंद्र घोनमोडे यांनी हिरवी झेंडी दाखविली. यावेळी प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्रा. गंगाधर जुआरे, प्रा.डॉ. विशाखा वंजारी, प्रा.डॉ. अमिता बन्नोरे, प्रा.डॉ. राजेंद्र चव्हाण, प्रा.डॉ. चंद्रकांत डोर्लीकर, प्रा.डॉ. जयेश पापडकर, प्रा. शशिकांत गेडाम, प्रा. दिलीप घोनमोडे, प्रा. पराग मेश्राम, प्रा.डॉ. विजय गोरडे, प्रा.डॉ. विजय रैवतकर, प्रा.डॉ. गजेंद्र कढव, प्रा. गजानन बोरकर आदी उपस्थित होते.

### दौड स्पर्धेतून विद्यार्थ्यांचा मतदार जागृतीचा संदेश



मतदार जनजागृती रॅली निमित्त दौड स्पर्धेविषयी विद्यार्थ्यांना प्रा. दिलीप घोनमोडे निर्देश करतांची वृत्तपत्रातील बातमी



Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

# महात्मा गांधी महाविद्यालयात मतदानाचे प्रात्यक्षिक



आरमोरी : आगामी होणाऱ्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांनी निःसंशयाने मतदानाचा अधिकार बजवावा यासाठी येथील महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व.न.पं. वाणिज्य महाविद्यालयात विद्यार्थ्यांकरिता प्रात्यक्षिक करण्यासाठी मतदान यंत्र ठेवण्यात आले होते. प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील मतदान नोंदणी विभागाचे प्रमुख प्रा. मोहनलाल रामटेके यांनी तहसीलदार व त्यांची चमू यांच्या उपस्थित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मतदान यंत्राचा परिचय, प्रत्यक्ष मतदानाच्या क्षणी होणाऱ्या कृती आणि मतदान यंत्राची कार्यप्रणाली याविषयी विद्यार्थ्यांनी मतदानयंत्र, व्हीव्ही पॅट यंत्र यांची जोडणी व कार्यप्रणाली समजून घेतली. यशस्वीतेसाठी प्रा. गजानन बोरकर, प्रा.डॉ. राजेश चव्हाण, प्रा.डॉ. ज्ञानेश्वर ठाकरे आदींनी सहकार्य केले.

# शेकडो विद्यार्थ्यांनी केले मतदानाचे प्रात्याक्षिक

आरमोरी : आगामी लोकसभा निवडणुकीत मतदारांनी मतदानाचा हक्क बजवावा, या हेतुने स्थानिक महात्मा गांधी महाविद्यालयात विद्यार्थ्यांकरीता मतदानाचे प्रात्याक्षिक करण्यात आले. यावेळी शेकडो विद्यार्थ्यांनी मतदान यंत्राद्वारे मतदानाचे प्रात्याक्षिक केले.

प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील मतदान नोंदणी विभागाचे प्रा. मोहनलाल रामटेके यांनी मतदान प्रात्याक्षिकाचे आयोजन केले होते. यावेळी तहसीलदार व त्यांची चमू उपस्थित होती. विद्यार्थ्यांनी मतदान यंत्राची माहिती, व्ही व्ही पॅट यंत्र आणि जोडणी व कार्यप्रणाली समजून घेतली. नव्याने निर्माण झालेल्या विद्यार्थी मतदारांनी मोठ्या जिज्ञासेने यंत्रणप्रणाली समजून घेतली आणि लोकसभा निवडणुकीत मतदान करण्याचा निर्णय घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. गजानन बोरकर, रासेयो प्रमुख प्रा. डॉ. राजेश चव्हान, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

**मदतानाचे प्रात्यक्षिक विषयक वृत्तपत्रातील बातमी**

# शालेय विद्यार्थियों ने ली मतदान की शपथ



आरमोरी. महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय में राष्ट्रीय मतदाता दिवस के उपलक्ष्य में महाविद्यालयीन विद्यार्थियों ने मतदान की शपथ ली। प्रा.डा. लालसिंह खालसा के मार्गदर्शन में मतदान जनजागृति विभाग प्रमुख प्रा. मोहन रामटेके ने कार्यक्रम का आयोजन किया। कार्यक्रम के दौरान प्रा. डा. विजय रेवतकर ने प्रतिज्ञा पठन की। प्रा. डा. रमेश ठोंबरे, प्रा. डा. राजेंद्र घोनमोडे, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. डा. राजेंद्र चव्हाण आदि उपस्थित थे। कार्यक्रम की सफलता के लिए प्रा. गंगाधर जुआरे, प्रा. डा. अमिता बन्नोरे, प्रा. डा. विशाखा वंजारी ने प्रयास किया।



**शपथ मतदानाची**

आरमोरी : स्थानिक महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय मतदारदिनानिमित्त मतदानविषयक जनजागृती करण्यात आली. यावेळी मतदानाची शपथ घेताना विद्यार्थी व प्राध्यापक.

**मतदान करण्याविषयी महाविद्यालयीन प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी घेतलेल्या शपथेची वृत्तपत्रातील बातमी**




M.G. Arts, Science & late N.P. Commerce College ★ Armori ★

Principal
Mahatma Gandhi Arts, Science & Late N. P. Commerce College, Armori, Dist - Gadchiroli

➢ गोंडवाना विद्यापीठ निर्देशीत प्रकल्प :—





लोकसंख्या शिक्षण आणि महिला अध्ययन व सेवा केंद्र प्रकल्पासाठी माहिती गोळा करतांना विद्यार्थी

प्रा. दिलीप घोनमोडे

Adult Education, Population Club / Literary Association

समिती प्रमुख

महात्मा गांधी कला, विज्ञान व

स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय,

आरमोरी, जि. गडचिरोली

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli